# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -1

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा - 2025

## 10. दिव्यांग उमेदवार : लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत

## मार्गदर्शक सूचना

केंद्र शासनाकडून दिव्यांग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ ऐवजी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ दिनांक १९ एप्रिल, २०१७ पासून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील तरतुदी लक्षात घेऊन क्रमांक ३४-०२/२०१५-डी-डी-तीन, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे केंद्र शासनाकडून 'लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींचे परीक्षा आयोजित करण्याकरीता मार्गदर्शन सूचना २०१८' (Guidelines for conducting written examination for persons with benchmark Disabilities २०१८) जारी करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचानांनुसार दिव्यांग व्यक्तींच्या परीक्षा आयोजित करताना संपूर्ण देशभरात एकसारखे व सर्वसमावेशक धोरण असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्तूत मार्गदर्शक सूचनांच्या आधारे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित परीक्षांमध्ये लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेले उमेदवार लिहिण्याकरीता सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक तसेच अन्य सोयी सवलती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत:-

**१.१ लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची अनुज्ञेयता:-**

(१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ (आर) मध्ये विहित केलेल्या फक्त दृष्टिहिन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित व किमान 40% कायमस्वरुपी विकलांगत्त्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल व अनुग्रह कालावधी (Compensatory time) अनुज्ञेय राहील.

**(२) लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची अनुज्ञेयता**:-

1.1 दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील कलम 2 (आर) मध्ये विहित केलेल्या व किमान 40% लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने मागणी केल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय आहे

1.2 लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची सुविधा घेण्याकरीता लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) धारण करणे व ते परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

1.3 लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवराने केंद्र शासनाच्या १९ ऑगस्ट २०१८ रोजीच्या मार्गदर्शक सूचनाव्दारे विहित करण्यात आलेले दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्रधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (Certificate Regarding physical limitation in an examinee to write) धारण करणे व ते परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. ( प्रमाणपत्राचा नमुना (नमुन क्रमांक - ११) सोबत जोडण्यात आला आह.)

1.4 खालिल दिव्यांगत्व प्रकारातिल उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Certificate regarding physical limitation in an examinee to write) सादर करणे अनिवार्य नाही.

१) Blindness

२) Locomotor disability - both arm affected-BA

३) Cerebral palsy

**२. उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्यास लक्षात घ्यावयाच्या महत्वाच्या बाबी :-**

**२.१** उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार असल्यास लेखनिकाची शैक्षणिक अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने परीक्षेच्या वेळी विहित नमुन्यामध्ये (नमुना क्रमांक - १२) वचनपत्र (Letter of Undertaking for Using Own Scribe) भरून देणे आवश्यक आहे.

**२.२** दिव्यांग उमेदवारास ज्या परीक्षेकरीता लेखनिकाची मदत घ्यावयाची आहे. त्या परीक्षेकरीता संबंधित लेखनिक त्याच वर्षा किंवा त्यपूर्वी कोणत्याही वर्षी उमेदवार असल्यास उमेदवारास अशा लेखनिकाची निवड करता येणार नाही.

**२.३** एखद्या व्यक्तीने एका उमेदवारास लेखनिक म्हणून मदत केल्यास सदर व्यक्ती त्याच उमेदवारास पुन्हा पुढील परीक्षांमध्ये लेखनिक म्हणून मदत करू शकेल. परंतू, लेखनिक म्हणून एखाद्या उमेदवाराला मदत केलेली व्यक्ती दुसऱ्या उमेदवाराला लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही.

**२.४** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत एखाद्या पदावर निवड झालेली व्यक्ती दिव्यांग उमेदवारास लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही.

**२.५** वेगवेगळया विषयाच्या पेपरसाठी मुख्यत्व्येकरून भाषाविषयक पेपरसाठी वेगवेगळे लेखनिक घेण्याची दिव्यांग उमेदवारास परवानगी राहील, तथपि, एका विषयाकरीता एकल लेखनिक घेता येईल. उमेदवाराने त्याच्या विनंती अर्जामध्ये त्याप्रामणे स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

**२.६** दिव्यांग उमेदवाराने लेखनिकाच्या निवडीसंदर्भातील सदर सूचानांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केले असल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास सदर सूचनांचे कोणत्याही प्रकारे उल्लघंन केले असल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराने व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल अथवा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स्वेच्छधिकारानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत निवडीकरीता प्रतिरोधित (Deber) करण्यत येईल.

**३. लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता पूर्व परवानगी घेणे :-**

**३.१** दिव्यांग उमेदवाराने जाहिरातीस अनुसरून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना दिव्यांगत्वाच्या प्रकारीची नोंद केल्यानंतर त्यास लेखनिकाची तसेच अनुग्रह कालावधीची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच, लेखनिकाची आवश्यता असल्यास ले ानिकाची व्यवस्था उमेदवार स्वत: करणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे. याचाही स्पषट उल्लेख असणे आवश्यक आहे.

**३.२** परीक्षेच्या वेळी लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्याबाबत जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने ऑनलाईन अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत सोबतच्या विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) आयोगाकडे विनंती अर्ज करुन लेखनिक आणि/अथवा अनुबग्रह कालावधीची आवश्यकता असलयाबाबत स्पष्ट मागणी करणे आवश्यक आहे. विनंती अर्ज टपालाक्षरे किंवा pre-examination@mpsc.gov.in या ईमेलवर पाठविण्यात यावा.

**३.३** लेखनिकाच्यामदतीची आवश्यकता असणाऱ्या उमेदवाराने पूर्व परवानगीकरीता खालील कागदपत्रे सादर करेण आवश्यक आहे:-

(१) विनंती अर्ज(सोबत जोडलेल्या नमन्यामध्ये) (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२)

(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-२०१८/सीआर४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर २०१८ नुसार सगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान ४० टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतच्याप्रमाणपत्राची छायांकितप्रत.

(३) दिव्यांगत्वामुळेउमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलयाबाबत विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या प्रमाणप्रत्राची छायांकित प्रत (Certificate regarding physical limitation in an examinee to write) (सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये) **(नमुना क्रमांक -११)**

(४) लेखनिकच्या आधार कार्डची छायांकित प्रत.

**३.४** केवळ अनुग्रह कालावधीची (Compesatory Time) मागणी करणाऱ्या उमेदवारांनी पूर्व परवानगीकरीता आयोगास खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे:-

(1) विनंती अज्र (सोबत जोडलेलया नमुन्यामध्ये) (प्रपत्र-1 अथवा प्रपत्र-2)

(2) शासन निण्रय, साव्रजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-2012/प्र.क्र. 297/आरोग्य-6, दिनांक 6 ऑक्टोबर, 2012 अथवा शासन निण्रय, साव्रजनिक आरोगय विभाग, क्रमांक अपवि-2018/सीआर46/आरोग्य-6, दिनांक 14 सप्टेंबर, 2018 नुसार संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान 40 टक्के दिव्यांगतव असलयाबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

(3) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलयाबाबत विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत (Certififate regarding physical limitation in an examinee to write) (सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये) **(नमुना क्रमांक**-19)

3.1 लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता केलेला विनंती अर्जातील तपशील संपूर्णपणे भरलेला असणे व तयावर उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा तसेच लेखनिकाची स्वाक्ष्ज्ञरी (लागू असलयास) असणे आवश्यक आहे.

3.2 दिव्यांग उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह केलेल्या विनंती अर्जाची व त्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करुन परीक्षेच्या वेळी मूह प्रमाणपत्रांची पडताहणी करण्याच्या अधीन राहून त्यांना मागणीप्रमाणे लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात येईल. अशा प्रकारे पूर्व परवानगी दिलेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी प्रसिध्द करण्यात येतील.

## 1.4 **प्रत्यक्ष परीक्षेच्या वेही अवलंबविण्यात येणारी कार्यपध्दत**:-

4.1 लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची पूर्व परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी संबंधित उपकेंद्रप्रमुख/समवेक्षक यांच्याकडे सत्र संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीकरीता सादर करणे अनिवार्य आहे.

4.2 लेखनिकाची आवश्यकता असणाऱ्या व आयोगाच्या आर्यागाच्या कार्यालयाकडून पूर्व परवानगी घेतलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे:-

(1) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-212/प्र.क्र.297/आरोग्य-6, दिनांक 6 ऑक्टोबर, 2012 अथवा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-2018/सीआर46/आरोग्य-6, दिनांक 14 सप्टेंबर, 2018 नुसार संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान 40 टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(2) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले मूळ प्रमाणपत्र (नमुना क्रमांक -11) (Certififate regarding physical limitation in an examinee to write) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(3) लेखनिकाचे मूळ आधार कार्ड (ओळख पडताळणीसाठी) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(4) लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे विहित नमुन्यातील(नमुना क्रमांक-9) संयुक्त प्रमाणपत्र (लेखनिकाच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोसह)

(5) स्वत:चा लेखनिक वापरण्यासंदर्भात विहित नमुन्यातील (नमुना क्रमांक -12) मूळ वचनपत्र (Lteer of Undertaking for Using Own Scribe).

4.3. केवळ अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) पूर्व परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांनी परीक्षेच्या पूर्वी तपासणीकरीता खालील मूळ कागदपत्रे तसेच त्यांच्या छायांकित प्रती सादर करणे अनिवार्य आहे:-

(1) शासन निर्णया, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-2012/प्र.क्र.297/आरोग्य-6, दिनांक 6 ऑक्टोबर 2012 अथवा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि-2018/सीआर46/आरोग्य-6, दिनांक 14 सप्टेंबर, 2018 नुसार संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान 40 टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(2) दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले मूळ प्रमाणपत्र (नमुना क्रमांक-11) ) (Certififate regarding physical limitation in an examinee to write) व त्याची स्वसाक्षांकित छायांकित प्रत.

(3) अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) मागणी करणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र (नमुना क्रमांक -10)

4.4. उपरोक्त सर्व कागदपत्रे प्रत्येक पेपरकरीता स्वतंत्ररित्या सादर करणे अनिवार्य आहे.

4.5. पूर्व परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांपैकी लेखनिकाची स्वत: व्यवस्था करणाऱ्या उमेदवारांबाबत संबंधित लेखनिकाच्या परीक्षा केंद्रावरील उपस्थितीबाबतची जबाबदारी उमेदवाराची

राहील. लेखनिक उपस्थित नसलयाच्या कारणास्त्व ऐनवेळी लेखनिकाची व्यवस्था आयोगाच्या कार्यालयाच्या कार्यालयामार्फत कोणत्याही परिस्थितीत केली जाणार नाही.

4.6 लेखनिकाची व्यवस्था आयोग्याच्या कार्यालयामार्फत करण्याचा पर्याय निवडलेल्या व त्याबाबत पूर्व परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांबाबत परीक्षा उपकेंद्रावर लेखनिकाची व्यवस्था करण्यात येईल. उमेदवाराने मागणी केल्यास आयोगामार्फत व्यवस्था केलेल्या लेखनिकास परीक्षेपूर्वी भेटण्याची परवानगी देय राहील.

4.7 लेखनिकाची मदत घेण्याची पूर्व परवानगी देण्यात आलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी 20 मिनिटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

4.8 लेखनिकाची मदत न घेता केवळ अनुग्रह कालावधीची पूर्व परवानगी घेतलेल्या उमेदवारांनाही परीक्षेच्या प्रत्येक तासाठी 20 मिनिटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

4.9 काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्यापुर्वी ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार संबंधित अपकेंद्रप्रमुखांना राहतील.

4.10 उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारास करावी लागेल.

4.11 लेखनिकाची आयोगाच्या कार्यालयामार्फत पुरविण्यात आला असल्यास आयोगाने विहित केल्याप्रमाणे लेखनिकाचे मानधन संबंधित उपकेंद्रपमुखांकडे परीक्षा सुरु होण्यापुर्वी जमा करणे आवश्यक राहील.

1.5 **लेखतनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारांकरीता विशेष सूचना** :-

5.1 दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि/अथवा उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास लेखनिकाची मदत अनुज्ञेय आहे. यास्तव, लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने सांगितलेले उत्तर छायांकित करण्यास/लिहिण्यास मदत करणे अपेक्षित आहे.

5.2 लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहित ठिकाणी छायांकित करणे/लिहिणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप/मार्गदर्शन/सूचना करुन नये.

5.3 लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबात अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा/गप्पा करु नयेत. तसेच, इतर लेखनिक/उमेदवार यांच्याशी बोलू नये.

5.4 दिव्यांग उमेदवार व लेखनिक यांना आयोगाच्या परीक्षांचे सर्व नियम/सूचना जशाच्या तशा लागू असतील.

5.5 उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

5.6 आयोगाच्या कार्यालयाकडून अथवा परीक्षेच्या वेळी संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन केल्यास उमेदवार व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यात येईल अथवा आयोगाच्या स्वेच्छधिकारानुसार आयोगामार्फत निवडीकरीता प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

२. निवड प्रक्रिया अथवा मुलाखत अथवा निवडीनंतर कामावर रूजू होताना अथवा कोणत्याही टप्यावर, दिव्यांगत्वामुळे लिहिण्याच्या वेगावर मर्यादा येत असल्यामुळे परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यान नियुक्त केलेल्या वैद्यकीय मंडळाची खात्री पटविण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

३. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह कालावधी घेण्याबाबत विहित निकषांची उमेदवाराकडून पूर्तता होत नसल्याचे अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवाराची परीक्षेची उमेदवारी रद्द करून उमेदवारास व लेखनिकास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स्वेच्छाधिकारानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल व/अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकरणी उमेदवाराची शासन सेवेतील पदावर नियुक्ती झ ाली असेल तर त्याची सेवा समाप्ती करण्यास तो पात्र राहील.

४. सदर मार्गदर्शक सूचना आयोगामार्फत यापुढे आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांकरीता लागू होतील.

दिनांक :

**प्रपत्र** -1

विकलांग व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज

प्रेषक :

नाव--------------------------

पत्ता--------------------------

--------------------------

दिनांक:----/----/20----

प्रति,

मा.आयुक्त

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

डॉ.आंबेडकर रोड, पुणे -1

विषय : विकलांग व्यक्तींना परीक्षेच्या वेळी लेखनिक व/किंवा अनुग्रह

कालावधी उपलब्ध करुन देण्याबाबत

महोदय,

मी विकलांग उमेदवार असून दिनांक---------------- रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन TET परीक्षेसाठी अर्ज सादर केला आहे. सदर परीक्षेच्या उमेदवारी संदर्भातील माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.:-

(१) परीक्षेचे नाव:--------------------------------------------------------------------
(२) परीक्षेच्या प्रस्तावित दिनांक:- ------/------/20----
(३) नोंदणी क्रमांक:- ----------------------------------------------
(४) परिषदेकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांक:- ----------------------------
(५) परिषदेकडील नोंदणीकृत ईमेल आयडी:- --------------------------------------------

मी दृष्टीहीन/अल्पदृष्टी/अस्थिव्यंग/सेरेब्रल पाल्सी/डिस्लेक्सियाने बाधित (लागू नसेल ते खोडावे) विकलांग व्यक्ती असून परीक्षेच्या वेळी स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी मी सक्षम नाही. विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील शासनाच्या नियम/सूचनानुसार मला लेखनिकाची/अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे.

विहित विकलांगत्त्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

विकलांगत्त्वामुळे स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याने/उत्तरे लिहिण्याच्या वेगावार मर्यादा येत असल्यामुळे, परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत/नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत (लागू नसेल ते खोडावे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

प्रस्तुत परीक्षेकरीता लेखनिकाची व्यवस्था मी स्वत: करणार असून लेखनिक म्हणून मी निवडलेल्या व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

लेखनिकाचे नाव - ----------------------------------------------------------------------
लेखनिकाचा जन्मदिनांक - -----/-----/--------- लेखनिकाचे जन्मठिकाण - --------------
लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता - -----------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------------------
लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांक - ---------------- लेखनिकाचा आधार क्रमांक------------------------
(आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)
मोबाईल नंबर- (1) उमेदवार- ----------------------- (2) लेखनिक- ---------------------
लेखनिकाची शैक्षणिक अर्हता - ---------------------- उमेदवाराचे लेखनिकाशी नाते (असल्यास)----------

विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील तसेच, परिषदेने दिलेल्या इतर सर्व सूचना वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडउ्न पूर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत:बददल तसेच लेखनिकाबददल दिलेली माहिती चूकीची/खोटी असल्याने अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याने कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रदद करुन उमेदवारास व लेखनिकास परिषदेच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल, अथवा इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची आम्हास जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी----------------------- लेखनिकाची स्वाक्षरी--------------------

दिनांक----------------------- दिनांक---------------------

सोबत:-

(१) विकलांगत्त्वाबाबत विहित वैदयकीय प्रमाणपत्र
(२) लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत/नियमानुसार अनुग्रह कालावधी आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने सही व शिक्क्यासह प्रदान केलेल्या मूळ वैध प्रमाणपत्राची (प्रपत्र -2) छायांकित प्रत
(३) लेखनिकाच्या आधारकार्डची/ओळखपत्राची उमेदवाराने व लेखनिकाने स्वसाक्षांकित केलेली प्रत.

प्रपत्र-२

**Certificate of Disability in Dominant (Writing) Extremity**
**(In case of Utilizing Services of scribe and / or Compensatory time)**

**NAME OF THE HOSPITAL:---------------------------------------------------------------------------**

| Recent PP size attested photograph (Showing face only) Of the person with disability |
|---|

Certificate No.---------------------------- Date:--------------------------
This is to certify that we have carefully examined
Shri/Smt./Kum.-------------------------------------------------------------------------------son/wife/daughter of Shri---
---------------------------------------------------------------------------------------

Date of Birth (DD/MM/YY) ----- ----- -------- Age---------years, male/female-----------------------------
Registration No.--------------------- Address-------------------------------------------------------------Village/
City--------------------------Tq----------------------------District------------------------,whose photograph
Is affixed above, and satisfied that :

(1)He/She is a person with disabilities suffering from:-
**Low Vision/Blindness/Locomotor disability/Cerebral Palsy/Dyslexia**-----------------------------

(2)In the light of above his/her overall permanent physical impairment/disability is---------------percent (In word-------------percent) in relation to his/her----------------------(Part of Body) as per guidelines(To be specified)

(3)It is to certify that he/she is having disability due to which his/**her writing speed is affected permanently** and he/she needs a writer (Scribe)as permissible under Government of India rules governing the recruitment of Physically Challenged Person.

(4)It is to certify that he/she may be allowed writer (Scribe) during the course of examination.

(5)It is to certify that he/she may be given Compensatory time of 20 minutes of every hour of examination.

2. The applicant has submitted the following document as proof of residence:-

| Nature of Document | Date of issue | Details of authority issuing certificate |
|---|---|---|

(Signature and seal of the Medical Authority)

| Dr------------------------- | Dr------------------------- | Dr------------------------- |
|---|---|---|
| President | Member Secretary | Concerned Specialist |

Signature/Thumb impression of the person in whose favour disability certificate is issued---------

Strike out which ever is not applicable

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## प्रपत्र-३

(लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र)

१.परीक्षेचे नाव:- ------------------------------------------ २.दिनांक:- / /२० ३.वेळ:- ते

४.विषय:- ----------------------------------------------------------------

५.केंद्र:- ---------------------------------------------

लेखनिकाचा पासपार्ट आकाराचा फोटो या ठिकाणी चिकटवावा.

**उमेदवार व लेखनिकाची माहिती:-**

१.उमेदवाराचे नाव:- -----------------------------------------------

२.उमेदवाराचा बैठक क्रमांक:- ---------------------------------------

३.लेखनिकाचे नाव :- ----------------------------------------------

४.लेखनिकाचे जन्मदिनांक:- / /

५.लेखनिकाचे जन्मठिकाण:- ---------------------------------------

६.लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता:- ------------------------------------------------------

------------------------------------------------------

७.लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांक:- --------------------------- (आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट यापैकी एक)

८. लेखनिकाचा आधार क्रमांक------------------------ (लेखनिकाच्या आधार कार्डची मुळ प्रत दाखविणे व स्वसाक्षांकित प्रत समवेक्षकांना देणे आवश्यक आहे.)

९.मोबाईल नंबर- (१) उमेदवार- -------------------------- (२) लेखनिक- --------------------------------

१०.लेखनिकाची शैक्षणिक अर्हता:- -----------------------------------------

११.उमेदवाराचे लेखनिकाचे नाते (असल्यास):- -------------------------------------

## -: प्रमाणपत्र :-

आम्ही निम्नस्वाक्षरीकार श्री/श्रीमती/कुमार/कुमारी----------------------------------------- (उमेदवाराचे नाव) या परीक्षेकरीता पात्र उमेदवार व श्री/श्रीमती/कुमार/कुमारी-------------------------------------------- (लेखनिकाचे नाव) पात्र उमेदवाराचा लेखनिक, खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र करतो की,

(१)आमच्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील माहिती सत्य व बिनचूक आहे. विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भात सर्व सूचना आम्ही वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

(२)विकलांग उमेदवारांना लेखनिक पुरविणासंदर्भातील शासनाच्या नियम/सूचनानुसार **उमेदवाराला लेखनिकाची आवश्यकता आहे.**

(३)विहित विकलांगत्वाबाबत सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावरील चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.

(४)लेखनिकाची मदत घेणारा उमेदवार नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा अनुग्रह (Compensatory) वेळेसाठी पात्र आहे, याची आम्हाला जाणीव आहे.

(५)उमेदवाराने लेखनिक नेमला असल्यास त्यास दुस-या उमेदवाराला अन्य परीक्षेत लेखनिक म्हणुन काम काम करता येणार नाही, याची आम्हाला/मला जाणीव आहे.

(६)उमेदवार व लेखनिक एकाच परीक्षेकरीता उमेदवार नाहीत.

(७)लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह वेळ घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत: बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेदवारी रदद करुन उमेदवारास व लेखनिकास स्वेच्छधिकारानुसार परिषदेमार्फत आयोजित केल्या जाणा-या परीक्षांमधून प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल. अथवा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

उमेदवाराची स्वाक्षरी----------------------- लेखनिकाची स्वाक्षरी----------------------

दिनांक----------------------- दिनांक----------------------

प्रतिस्वाक्षरी

शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक (प/द/उ) मुंबई